देवतांची उपासना : शक्ति – खंड ३

# देवीपूजनाचे शास्त्र

## (कुंकुमार्चन, ओटी भरणे आदींचे शास्त्र !)

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते

**श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ आणि अन्य**



सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,००० प्रती आणि या लघुग्रंथाच्या आतापर्यंत २,०१,४०० प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : ऑक्टोबर २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ७२ सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी हिंदुत्वनिष्ठांना दिशादर्शन !

८. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘www.Sanatan.org’.)**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥

– जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

## श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ (M.Sc.) यांचा परिचय



सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. त्यांना सहस्रो पाने सूक्ष्मातील ज्ञान मिळाले आहे. हिंदु राष्ट्रासाठी नाडीभविष्यात महर्षींनी सांगितल्याप्रमाणे देवदर्शन आणि संतांचे संघटन यांसाठी त्या अखंड भारतभ्रमण करतात.

# अनुक्रमणिका


卐 मनोगत ७

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ९

१. देवीपूजनाच्या काही नेहमीच्या कृती आणि शास्त्र ११

२. गौरी तृतीयेला (चैत्र शुक्ल तृतीयेला) केले जाणारे देवीचे पूजन ३१

३. हरितालिकेला (भाद्रपद शुक्ल तृतीयेला) केले जाणारे देवीपूजन ३३

४. नवरात्रीतील देवीच्या उपासनेमागील शास्त्र ३३

५. विजयादशमीला (दसऱ्याला) देवीचे पूजन करणे ५०

६. आश्विन अमावास्येला (दिवाळीतील अमावास्येला) लक्ष्मीपूजन करणे ५२

७. ‘देवीचा गोंधळ घालणे’ या कृतीमागील शास्त्र काय ? ५५

८. ‘देवीकडे जोगवा मागणे’ या कृतीमागचे शास्त्र काय ? ५७

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ५९

# मनोगत

तुळजापूरची श्री भवानीदेवी, कोल्हापूरची श्री महालक्ष्मीदेवी, माहूरची श्री रेणुकादेवी, वणीची श्री सप्तशृंगीदेवी.... अशा सर्व देवी म्हणजे, आदिशक्ति श्री दुर्गादेवीची कार्यानुमेय अवतरलेली रूपे होत. जसे श्रीराम आणि श्रीकृष्ण ही श्रीविष्णूची रूपे आहेत, तसेच हे आहे. यामुळे सर्व देवीरूपांच्या पूजनाशी संबंधित सर्वसाधारण कृती या सारख्याच आहेत. प्रस्तुत लघुग्रंथात अशा कृतींचे, तसेच सण, उत्सव इत्यादींच्या प्रसंगी केल्या जाणाऱ्या देवीपूजनाशी संबंधित विशिष्ट कृतींचे शास्त्र दिले आहे.

देवतेचे पूजन करतांना पूजनातील कृतींचे शास्त्र कळले, तर त्या कृतींचे महत्त्व लक्षात येऊन पूजन अधिक श्रद्धेने होते. श्रद्धेतूनच भावाचा जन्म होतो आणि भावपूर्ण कृतीमुळे देवतेच्या तत्त्वाचा लाभ अधिक होतो. तसेच देवतेच्या पूजेची कृती अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्यरित्या केल्यास त्यातून मिळणारे फळ अधिक असते. हा उद्देश लक्षात घेऊन या

लघुग्रंथात देवीपूजनाच्या कृतींसंबंधी अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य विवरण दिले आहे.

देवीच्या विविध रूपांना कोणती फुले आणि का वहावीत, देवीची आरती कशी करावी, गौरी तृतीया आणि हरितालिका या दिवशी देवीपूजन केल्याने काय लाभ होतो, नवरात्रीत घटस्थापना, अखंड दीपप्रज्वलन, कुमारिका-पूजन आदी कृती करण्याचे महत्त्व काय, देवीचा गोंधळ घालणे अशासारख्या कृतींचा उद्देश काय इत्यादी नाविन्यपूर्ण आणि सूक्ष्म-स्तरावरील अध्यात्मशास्त्रीय ज्ञान या लघुग्रंथात दिले आहे.

या लघुग्रंथातील देवीपूजनाचे शास्त्र समजून घेऊन कृती करणाऱ्यास देवीचा कृपाशीर्वाद लवकर संपादन होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. - **संकलक**

---

'धार्मिक कृतींमागील शास्त्र' या ग्रंथमालिकेचे मनोगत 'पूजासाहित्याचे महत्त्व' या ग्रंथात दिले आहे.

**टीप** लघुग्रंथाच्या शेवटी इंग्रजी अक्षरांत दिलेला संकेतांक हा केवळ कार्यालयीन सोयीसाठी आहे. त्याचा लिखाणाशी संबंध नाही.